**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** **ISSN: 2581-6241** **Volume - 4, Issue - 6, June - 2021**
**Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal** **Impact Factor: 3.871**
**Received on : 01/06/2021** **Accepted on : 14/06/2021** **Publication Date: 30/06/2021**

# “कवयित्री शांता शेळके यांच्या साहित्यातील योगदान”

**डॉ. सविता ज्ञानेश्वर वावगे**
**प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,**
**श्री. मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर, जि. औरंगाबाद**
Email - wawgesavita@gmail.com

**सारांश:** गोंदण, अनोळख व जन्मजान्हवी या कवितामध्ये शांताबाईंची कविता आपल्याला नव्या भाषेची, नव्या आशयाची ओळख करून देते. प्रतिमासृष्टीचा सहज वावर असणारी त्यांची कविता प्रतिमेवर अवलंबून नव्हती तर स्वतःचे एक साधेपण, वेगळेपण जपत होती. रसिक वाचकांशी गप्पा मारण्यात तशी सहजसुंदर ही कविता होती त्यांच्या अनेक गीतांची लोकगीतांची लोकांना आजही मोहिनी आहे. हे अंगभूत चैतन्य असलेली त्यांची कविता ही आशय, शब्दकळा व प्रगल्भ विचार मांडणारी होती. त्यांनी एके ठिकाणी असे म्हटले होते की, त्यांच्या “हृदयाचे पाखरू भारी अस्थिर, व चंचल असून ते काव्यात्म आहे”. खरोखरच पटलाप्रमाणे कोमल, चंचल असून ते हळुवार अशी त्यांची कविता एकाचवेळी स्वप्नाळू व एकाचवेळी वास्तववादी होती. त्यांच्या कवितेत निराशा नव्हती, जीवनातील सुखांचा मनसोक्त आस्वाद त्यांच्या कवितेने घेतला. अलीकडच्या पिढीमध्ये न आढळणारी परमेश्वरी श्रद्धा त्यांच्या कवितेत नेहमीच आढळून आली. बुद्धीपेक्षा श्रद्धेला त्यांनी श्रेष्ठ मानले. निसर्गलाही त्यांनी परमेश्वराचा दर्जा दिला. जीवनात सुष्ट व दुष्ट या दोन्ही प्रवृत्ती असून त्यांच्या विश्वास सुष्ट म्हणजे चांगुलपणावर होता. शांताबाई नेहमी म्हणायच्या “माझी कविता म्हणजे माझे समाधान आहे” हेच समाधान ठायी-ठायी त्यांच्या कवितेत दिसून आले. त्यांच्या कवितेबरोबर वाचकही मनस्वी समाधानाचा अनुभव घेतात. तेजोनिधी भास्कर, पर्जन्याच्या धारा, वसंताचे आगमन, फुलांचा सुगंध, सागराची भव्यता या साऱ्या मध्ये त्यांनी सौंदर्य शोधले व तेच सौंदर्य त्यांच्या कवितेत उतरले. पाऊस, हिरवळ, पावसानंतर इत्यादी त्यांच्या कविता वाचल्या असता निसर्गातील सौंदर्य अधिकच देखणे आहे असे भासू लागते व शांताबाईच्या कवितेतील सौंदर्य अधिक की निसर्गसौंदर्य अधिक सुंदर हा प्रश्न रसिकांना पडतो सौंदर्यवाद खऱ्या अर्थाने त्यांच्या कवितेत दिसून येतो.

**प्रमुख शब्द:** प्रगल्भ, काव्यात्म, गुढगुंजन, प्रतिकवाद, सुष्ट व दुष्ट, सौंदर्यवाद, चषक, मूर्तरूप.

## 1. प्रस्तावना :

शांता शेळके हे असे व्यक्तिमत्व आहे की, त्यांचे नाव मराठी वाङ्मयामध्ये सोनेरी अक्षरांमध्ये लिहिले आहे. मराठी वाङ्मयामध्ये ज्या काही मोजक्या कवयित्री आहेत ज्यांच्या वाट्याला रसिकांचे प्रेम, पुरस्कार व दैवीकृपा लाभली, त्यामध्ये शांताबाई चे नाव अग्रणी घेतले जाते. शांताबाई चे व्यक्तिमत्व बहुआयामी होते. त्या प्राध्यापिका, संगीतकार, लेखिका, साहित्यिक, पत्रकार होत्या. एवढेच नाही तर श्रेष्ठ अनुवादकही होत्या निसर्ग, प्रेम, व्यक्ती, समाजव्यवस्था, त्यांच्या कवितेला खुणावत होत्या, अतिशय प्रगल्भ व्यक्तिमत्वाच्या शांताबाईचे लेखन एकाचवेळी संवेदनशील व प्रगल्भ पातळीवर जाणारे होते. त्यांच्या अनेक गीतांना पुरस्कार मिळाले त्यांची रेशमाच्या रेघांनी ही मराठी ‘लावणी’ तर आजही रसिकांना भुरळ घालते. वैयक्तिक जीवनात एकटेपणा भोगलेल्या शांताबाई साहित्यिक व्यक्ती म्हणून प्रसन्न होत्या. वैयक्तिक दुःख त्यांच्या साहित्याला कधीच ओलांडू शकले नाही. त्यांच्या काव्या मध्ये त्यांनी मानवी नातेसंबंधाचे अनेक पदर उलगडले आहे. १२ ऑक्टोंबर १९२२ रोजी पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथे जन्म झालेल्या शांताबाई पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरात शिकल्या पाच वर्ष आचार्य अत्रेच्या नवयुग मध्ये त्या संपादक होत्या. वसंत अवसरे या टोपण नावाने त्यांनी गीतलेखन केलेले आहे. अशा ह्या महान कवयित्री चा कर्करोगाने दिनांक ६ जून २००२ रोजी मृत्यू झाला.

## 2. कथा कादंबरी, कविता व इतर लेखन :

कविता ,कथा कादंबरी, व्यक्तिचित्रे, बालसाहित्य, चित्रपटगीते, समीक्षा, आत्मकथन, अनुवाद अशा विविध साहित्यप्रकारात लेखन केलेल्या शांता शेळके, वृत्तपत्र संपादक तथापि कवयित्री आणि गीतकार म्हणून आजच्या पिढीतही विशेष प्रसिद्ध आहेत. पुण्याच्या हुजूरपागा शाळेतून शालेय शिक्षण घेतल्यानंतर पुण्यातच सर परशुरामभाऊ महाविद्यालयात पुढील शिक्षण घेतले. एम्.ए.च्या परीक्षेत मराठी हा विषय घेऊन तात्यासाहेब केळकर सुवर्णपदक त्यांनी मिळविले. त्यानंतर मुंबई येथे अल्पकाळ आचार्य अत्रे यांच्या नवयुग साप्ताहिकात नोकरी केली. पुढे नागपूर आणि मुंबई येथील महाविद्यालयांतून मराठीचे अध्यापन केल.

बालसाहित्याच्या जगातही त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. अनेक नाटके, ध्वनी मुद्रिका, चित्रपटांसाठी त्यांनी विपुल गीतलेखन केले. 'तोच चंद्रमा', 'कळयांचे दिवस फुलांच्या राती', 'चित्रगीते' ही त्यांची गीतसंकलने प्रसिद्ध आहेत. शांताबाईंनी हिंदी, इंग्रजी, संस्कृत या भाषांमधील साहित्याचे अत्यंत ओघवत्या शैलीत मराठी भाषांतर केलेले आहे. महाकवी कालिदासाचे 'मेघदूत', 'चौघीजणी' त्यांच्या कवितांबरोबरच त्यांचे गद्यलेखन सुद्धा खूप सुंदर आणि मनाला पकडून ठेवणारे आहे. वाचायला घेतले की सोडवत नाही त्यांची पुस्तके. त्यांचे गुलमोहोर, कावेरी, बासरी, इत्यादी कथासंग्रह तर ओढ, धर्म, अशा कादंब-या प्रसिद्ध आहेत.

Received on : 01/06/2021 Accepted on : 14/06/2021 Publication Date: 30/06/2021

धूळपाटी नावाचे त्यांचे आत्मचरित्र सुद्धा खूप सुंदर आहे. स्वतःच्या लहानपणाबद्दलच्या त्यातील आठवणी तर आपल्याला हेवा करायला लावतात. तसेच 'पावसाआधीचा पाऊस', 'आनंदाचे झाड', 'वडीलधारी माणसे' हे त्यांचे ललित लेख संग्रह खूपच गाजलेले आहेत. भाषांतर हे शांताबाईंच्या दृष्टीनी फक्त अर्थार्जनाचे साधन नव्हते तर स्वतःच्या भाषाभ्यासातील भर टाकणारेपण होते. त्यातील अत्यंत गाजलेले भाषांतर म्हणजे जपानी हायकुंचे. जपान मधील हा काव्यप्रकार त्यांनी अनुवादित करून मराठी रसिकांच्या पुढे 'पाण्यावरच्या पाकळया' नावानी ठेवला आणि तो लोकांना इतका आपला वाटला की लोक आता मराठी हायकू असंच म्हणतात.

जरी अनेक साहित्य प्रकार समर्थपणे हाताळले असले तरी, कविता लेखन हा शांताबाईंच्या विशेष आवडीचा साहित्य प्रकार. 'असेन मी नसेन मी' , 'वर्षा', 'रूपसी', 'गोंदण', 'अनोळख', 'जन्माजान्हवी' ही त्यांच्या कविता संग्रहांची काही नावे. 'मुक्ता आणि इतर गोष्टी' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. 'स्वप्नतरंग' ही त्यांची पहिली कादंबरी; तर 'शब्दांच्या दुनियेत' हा त्यांचा पहिला ललितलेखसंग्रह. त्यांनी उत्तम अनुवादही केले. “मागे उभा मंगेश पुढे उभा मंगेश” सारखी भक्ती गीते लिहिली. “शूर आम्ही सरदार” आणि “मराठी पाऊल पडते पुढे” या सारख्या चित्रपट गाण्यांनी अनेकांना स्फुरण दिलंय. वास्तविक शांता शेळके म्हणजे सगळया लहान मुलांच्या लाडक्या आजी. नातवंडांसाठी “किलबिल किलबिल पक्षी बोलती”, “विहीणबाई विहीणबाई” अश्या अनेक छान छान कविता, बालगीतं लिहिणा-या शांता शेळके यांनी अनेक वर्षे नाटक आणि चित्रपटांच्या सेन्सॉर बोर्डावर काम केले. १९९६ मध्ये आळंदी येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलानाच्या त्या अध्यक्षा होत्या. संतांचे अभंग व ओव्या, तसेच पारंपरिक स्त्रीगीते, लोकगीते इत्यादींचे संस्कार त्यांच्या कवितेतून प्रत्ययास येतात. गीतांचे लावण्या, कोळीगीते असे विविध प्रकार त्यांनी यशस्वीपणे हाताळले आहेत.

### 3. कवयित्री शांता शेळके यांना मिळालेले पुरस्कार :

- ग. दि. मांडगुळकर यांचा गीतलेखन पुरस्कार १९९६
- सुरसिंगार पुरस्कार ('मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश' या गीतासाठी)
- केंद्र सरकारचा उत्कृष्ट चित्रगीत पुरस्कार (चित्रपट भुजंग)
- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कार (२००१) मराठी साहित्यातील योगदानाबद्दल

### 4. कवयित्री शांता शेळके यांचा लिखाणातून जाणवणारी नवनिर्मिती :

शांताबाईनां ग. दि. मांडगुळकरांचा गीतलेखन पुरस्कार, केंद्र सरकारचा उत्कृष्ट चित्रगीत पुरस्कार, यशवंतराव चव्हाण पुरस्कार मिळाले. त्यांनी लिहिलेल्या मराठी स्तंभलेखनाचे कालांतराने पुरस्कारांमध्ये रूपांतर झाले. त्यामध्ये एकपाणी मदररंगी, जाणता – अजाणता यांचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो. शांताबाई ची कविता ही सहजतेतून आलेली होती. त्यामध्ये शिकवण, प्रबोधन करणे हा हेतू नसून खऱ्या अर्थाने उलट आणि तरल भाव दिसुन येतात. नवकवितेतील प्रतिकवाद व गुढगुंजनता त्यांच्या कवितेत दिसून येत नाही. वाचकांना धक्कातंत्र करून देणारी त्यांची कविता आहे. मराठी साहित्यात अजरामर ठेरलेली त्यांची कविता शृंगारीक होती पण अश्लीलतेकडे झुकणारी नव्हती हे विशेष लक्षात घ्यावे लागेल.

गोंदण, अनोळख व जन्मजान्हवी या कविताांमध्ये शांताबाईंची कविता आपल्याला नव्या भाषेची, नव्या आशयाची ओळख करून देते. प्रतिमासृष्टीचा सहज वावर असणारी त्यांची कविता प्रतिमेवर अवलंबून नव्हती तर स्वतःचे एक साधेपण, वेगळेपण जपत होती. रसिक वाचकांशी गप्पा मारण्यात तशी सहजसुंदर ही कविता होती त्यांच्या अनेक गीतांची लोकगीतांची लोकांना आजही मोहिनी आहे. हे अंगभूत चैतन्य असलेली त्यांची कविता ही आशय, शब्दकळा व प्रगल्भ विचार मांडणारी होती. त्यांनी एके ठिकाणी असे म्हटले होते की, त्यांच्या “हृदयाचे पाखरू भारी अस्थिर, व चंचल असून ते काव्यात्म आहे”. खरोखरच पटलाप्रमाणे कोमल, चंचल असून ते हळुवार अशी त्यांची कविता एकाचवेळी स्वप्नाळू व एकाचवेळी वास्तववादी होती. त्यांच्या कवितेत निराशा नव्हती, जीवनातील सुखांचा मनसोक्त आस्वाद त्यांच्या कवितेने घेतला. अलीकडच्या पिढीमध्ये न आढळणारी परमेश्वरी श्रद्धा त्यांच्या कवितेत नेहमीच आढळून आली. बुद्धीपेक्षा श्रद्धेला त्यांनी श्रेष्ठ मानले. निसर्गलाही त्यांनी परमेश्वराचा दर्जा दिला. जीवनात सुष्ट व दुष्ट या दोन्ही प्रवृत्ती असून त्यांच्या विश्वास सुष्ट म्हणजे चांगुलपणावर होता. शांताबाई नेहमी म्हणायच्या “माझी कविता म्हणजे माझे समाधान आहे” हेच समाधान ठायी-ठायी त्यांच्या कवितेत दिसून आले. त्यांच्या कवितेबरोबर वाचकही मनस्वी समाधानाचा अनुभव घेतात. तेजोनिधी भास्कर, पर्जन्याच्या धारा, वसंताचे आगमन, फुलांचा सुगंध, सागराची भव्यता या साऱ्या मध्ये त्यांनी सौंदर्य शोधले व तेच सौंदर्य त्यांच्या कवितेत उतरले. पाऊस, हिरवळ, पावसानंतर इत्यादी त्यांच्या कविता वाचल्या असता निसर्गातील सौंदर्य अधिकच देखणे आहे असे भासू लागते व शांताबाईच्या कवितेतील सौंदर्य अधिक की निसर्गसौंदर्य अधिक सुंदर हा प्रश्न रसिकांना पडतो सौंदर्यवाद खऱ्या अर्थाने त्यांच्या कवितेत दिसून येतो.

शब्दावर राज्य करणाऱ्या शांताबाई नंतर त्यांचे स्थान घेणारी एकही कवयित्री दिसून येत नाही. भावनेला अनुरूप शब्द आणि अर्थ यांचे सामर्थ्य व त्या जोडीला कमालीची उत्कटता यामुळे शांताबाईची कविता स्त्रीकवयित्री मध्येच नाहीतर पुरुष कवीमध्ये ही श्रेष्ठ ठरली. शब्दांमध्ये विलक्षण सामर्थ्य असलेली त्यांची कविता भावगीत केंव्हा बनली हे कळलेसुद्धा नाही तरीही साहित्यातील उत्कृष्ट भावगीतकारांमध्ये शांताबाईचे नाव निश्चितच उच्च पातळीवर आहे.

माधव ज्युलियन यांना शांताबाई गुरुस्थानी मानत. रविकिरण मंडळाच्या कविता वाचताांना व माधव ज्युलियन यांच्या कवितेचा संस्कार माझ्या काव्यावर झाला असे त्या अभिमानाने सांगत. खरा कलाकार हा नम्र व इतर कलाकारांचा आदर करणारा असतो. शांताबाई मुळातच संवेदनशील होत्या त्यामुळे इतरांची मोठेपण स्वीकारण्याचे प्रगल्भ मन त्यांच्यापाशी होते हेच प्रत्यंतर त्यांच्या कवितेत दिसून येते.

जेव्हा जेव्हा हृदयात आनंद दाटून येत होता तेव्हा त्यांच्या मनात मधुर भाव उसळी मारत असत तेव्हा तेव्हा-त्या कवितेमधून त्या भावनेला मोकळे करून देत असत. दुःखाचा कटू चषक घेऊन नियती त्यांच्या दारी आली तेव्हाही कवितेचा आश्रय करून नियतीची सारी कटूता त्यांनी सहजपणे प्राशन केली.

Received on : 01/06/2021 Accepted on : 14/06/2021 Publication Date: 30/06/2021

ज्या वेळेस त्यांच्या जीवनात भावना, प्रेम यांचा उदय झाला तेव्हा तेव्हा तो त्यांनी कवितेतून मांडला जी गूढ, लाजरी भावना जगापासून लपून ठेवणारी असावी तीही त्यांनी कवितेमधून सादर केली. जणू काही कवितेतून त्यांनी त्याची स्वप्नेही मूर्तरूपात अवतरली. त्यांच्याच एका कवितेतून त्यांचे आयुष्य त्यांनी त्यांच्या एका कवितेतून प्रकट केले. वर्षानुवर्षे त्या एकट्या राहिल्या नववर्षाचे स्वागतही त्यांनी एकटेपणाने केले. पुढील वर्षात तरी काही नवजीवन मिळेल का? असा प्रश्न विचारणारी त्यांची कविता खालील प्रमाणे होय.

कुठले पुस्तक कुठला लेखक
लिपी कोणती कसले भाकीत
हात एक अदृश्य उलटतो
पानामागून पाने अविरत

गतसालाचे स्मरण जागता
दाटून येते मनामध्ये भय
पण हे नवे यात तरी का
असेल काही प्रसन्न आशय

अखंड गर्जे समोर सागर
कणाकणाने खचते वाळू
तरी लाट ही नवीन उठता
सजे किनारा तीज कुरवाळू

स्वतः स्वतःला देत दिलासा
पुसते डोळे हसता हसता
उभी इथे मी पसरून बाहू
नववर्षा रे तुझ्या स्वागता!

एकटेपणा असूनही शब्दात कडवटपणा न घेता आपल्या भावना उत्कटपणे तरीही तरल मांडण्याचे विलक्षण सामर्थ्य हे शांताबाईंच्या कवितेत होते.

**5. शांताबाईंच्या नावाने दिले जाणारे पुरस्कार :**

- मंचरच्या कवयित्री शांता शेळके प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा ‘शांता शेळके साहित्य गौरव पुरस्कार.
- दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठानचा कवयित्री शांता शेळके पुरस्कार'''
- मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या दादर विभागातर्फे दिला जाणारा शांताबाई शेळके साहित्य पुरस्कार.

**संदर्भग्रंथ सूची :**

१. अर्चना संजय मुळये (२६ जुलै २०१९) “शांताबाईचे संस्मरणे” तरुण भारत अग्रलेख.
२. प्रभा गणोरकर (जानेवारी १९९६)“काही अंतस्थाचा रंग चढे वस्तूजातावर” दैनिक लोकसत्ता अग्रलेख.
३. समीर गायकवाड (ओक्टोंबर २०१५) “जीवनगाण्यांच्या कवयित्री-शांता शेळके” गोष्टी वेल्हाळाची बाराखडी.
४. मंगला गोखले (ऑगस्ट २०१९) “शांता शेळके” महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश.
५. https://web.archive.org/web/20180526111616/http://www.marathisrushti.com/profiles/shanta-shelke/
६. https://www.goodreads.com/book/show/36162704-kavita-smaranatlya